विशेष दिवाणी दावा क्रमांक ११/२०२१

निशाण क्रमांक ४१ / क सोबत

प्रतिवादी क्रमांक १ व २ तर्फे वकील व्ही. जी. देसाई यांचे मार्फत साक्षीदार क्रमांक १ अॅनी हॅरी फर्नाडीस याचा उर्वरीत उलट तपास सुरु

२३. मी माझ्या दाव्या मध्ये हॅरीचा मुलगा हॅरीचा सहया करु शकतो असे नमूद केलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, बँकेमध्ये व क्रेडीट संस्थेमध्ये सी.सी. टीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. मी या प्रकरणात सी.सी. टीव्ही कॅमेरेच्या फुटेज प्रतिवादी नंबर १ च्या संदर्भात सादर केलेले नाहीत. माझे पती चेक्स, व कागदपत्रे सही करुन ठेवत होते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, माझा मुलगा अॅलन च्या सहया करीत होता, तसेच त्यांनी सही करुन ठेवलेल दस्ताचा उपयोग करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०७/१९९१ रोजी झालेल्या दोन्ही दस्तावर माझे पक्ष म्हणून नाव नाही. (दिनांक १८/०७/१९९१ चा नोंद खरेदी पत्र साक्षीदारास दाखविण्यात येत आहे सबब त्यास निशाणी क्रमांक ८४ देण्यात येते. ) सदरील दस्तामध्ये माझे नाव नाही. (दिनांक १८/०७/१९९१ चा नोंद करारपत्र साक्षीदारास दाखविण्यात येत आहे सबब त्यास निशाणी क्रमांक ८५ देण्यात येते. ) सदरील दस्तामध्ये माझे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे दोन्ही दस्त मी वाचून समजावून न्यायालयात हजर केलेले आहेत.

२४. हॉटेल मॅनेजमेंट मध्ये प्रतिवादी नंबर १ पदवीधर आहे. प्रतिवादी नंबर ३ ही अनिमेशन मध्ये पदवीधर आहे तसेच तीचे डी.एड. चे ही शिक्षण झालेले आहे. अॅलन ने २०१० मध्ये शिक्षण पूर्ण केले आहे. या व्यतीरीक्त तो टॅटु डिझायनर, टुर अॅन्ड टुरिस्ट तसेच शितगृहातील समुद्रे मासे विकरण्याचा तो व्यवसाय करतो. हे म्हणणे बरोबर आहे की, हॉटेल मॅनेजमेंटची डिग्री घेतल्यानंतर

पुण्याला व्यवसाय सुरु केला. प्रतिवादी नंबर २ आय.टी. इंजिनिअर आहे. प्रतिवादी नंबर १ व २ याचा विवाह अंतरजातीय आहे. प्रतिवादी नंबर २ या पुणे येथे आय.टी. इंजिनिअर मध्ये नोकरी करीत होती. प्रतिवादी नंबर १ व २ यांनी आंबेगाव, पुणे येथे फ्लॅट खरेदी केला होता. हे मला माहित नाही की, फ्लॅट घेण्याकरीता त्यांनी बँकेच्या कर्जाची उचल केली होती. हे मला माहित नाही की, त्याचे हप्ते प्रतिवादी नंबर १ व २ भरत होते. साक्षीदार स्वताहून सांगतो की, बुर्कींग करतेवेळी आम्ही त्यांना रक्कम दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, बुर्कींग करतेवेळी आम्ही त्यांना रक्कम दिलेली होती हे मी खोटे सांगत आहे. बुर्कींगची रक्कम देण्यास मदत केल्याबद्दल कागदोपत्री पुरावा या प्रकरणात हजर केलेले आहेत. आम्ही चेकने पैसे दिलेले होते. सदरील फ्लॅट चे नांव हे ग्रॅन्ड व्हीव ७, फेज थ्री, फ्लॅट नंबर ११०६, ११ वा माळा, आंबेगाव, कात्रज बायपास रोड, पुणे असा त्याचा पत्ता आहे. इमारतीचा मालक कोण आहे हे सांगू शकत नाही. त्या इमारतीचा मालक मी बघीतलेला नाही. मी फ्लॅटचे कागदपत्र बघीतलेले आहेत. सदरील कागदपत्र हे हॅरीच्या मृत्यु नंतर बघीतलेले आहेत. हे मला आज आठवत नाही की, फ्लॅट घेताना कुठल्या प्रकारचे कागद बनविण्यात आले होते. फ्लॅटचे कागदपत्र हे प्रतिवादी नंबर १ व २ याच्या नावे आहेत.

मध्यंतरासाठी तहकुब

जबाब समक्ष नोंदविला.

दिनांक २२/०४/२०२५

सही/-

( श्री.न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज

मध्यंतरानंतर शपथेवर पुढे सुरु

२५. हे मला माहित नाही की, वरील मनूद फ्लॅट हा प्रतिवादी नंबर २ च्या नांवे घेण्यात आला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, अॅलन पुण्याला असताना त्याचा व्यवसाय चांगल्या रितीने चालत होताा. तसेच शितलची देखील नोकरी चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, ते सन २०१९-२०२० पर्यंत पुण्याला होते.

हे म्हणणे खरे नाही की, कोव्हीडच्या महामारी नंतर ते महागाव येथे राहण्यास आले. हे म्हणणे खरे नाही की, ते महिन्याची बचत करुन ते पैसे माझ्याकडे व हॅरी कडे जमा करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आणि तीच रक्कम धनादेशा व्दारे व रोखी व्दारे मी त्याला दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाीी की, पुण्याला फ्लॅट घेण्याकरीता बुर्कीग पूर्वी किंवा नंतर मी कुठलीही आर्थीक मदत अॅलन ला केलेली नाही. हे मला माहित नाही की, पुण्यातील फ्लॅट ही प्रतिवादी नंबर १ व २ ची स्वकष्टार्जीत मिळकत आहे. हे मला माहित नाही की, शितलने आयडीबीआय बॅंकेकडून कर्जाची उचल केली होती. हे मला माहित नाही की, कर्ज रक्कमचे हप्ते येणा-या पगारातून प्रतिवादी नंबर २ देत होते. पुण्याला फ्लॅट घेतल्याबद्दल माझी कोणीतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नंबर १ ने प्रतिवादी नंबर २ सोबत अंतर जातीय विवाह केल्याने ते मला मान्य नाही. प्रतिवादी नंबर १ व २ हे पुण्यावरुन २०१८ साली महागावला आले होते. इथे आल्यानंतर मी त्याच्या सोबत राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे राहत असताना माझी सर्व सेवा व श्रृती अॅलन व शितल करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, अॅलन, शितल व हॅरी याच्या मध्ये मतभेद नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, प्रतिवादी नंबर ३ ही वांटगी वरुन महागांवला येणे जाणे करीत होती या कारणावरुन प्रतिवादी नंबर १ व २ हे माझ्याशी वाद घालत होते.

२६. अॅलन महागाव येथे आल्यानंतर इथे आपला व्यवसाय करीत होते. तर शितल ही वर्क फ्राम होम करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, अॅलन व शितलने माझ्याशी कधीही भांडण व तंटा केलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, वादा बद्दल मी कुठेही तक्रार नोंदविलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, महागाव येथील घराचे लाईट बिल, पाणी पट्टी, घरफाळा सर्व अॅलन व शितलच बघत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला लागणारा सर्व खर्च अॅलन व शितलच बघत होती. माझे घर एक माळयाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, तळमाळयाला किंवा पहिल्या माळयाला राहण्याच्या कारणावरुन प्रतिवादीनंबर १ व २ व माझ्या मध्ये कधीही वाद झालेले नाहीत. महागाव येथे एकत्र राहत असताना थोडे दिवस आमचे

जेवण वगैरे एकत्र होते. हे म्हणणे बरोबर आहे की, हॅरी व माझी अशी दोन्ही पेन्शन मी घेते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, अॅलन हा माझ्याकडून एटीएम कार्ड चा जबरदस्तीने करुन पैसे वारंवार काढून घेत होता. अॅलन एटीएमचा गैरवापर करतो याबाबत मी बँकेमध्ये कधीही तक्रार केलेली नाही. सदरील एटीएम कार्ड हे मी बंद केलेले आहे. ते कधी बंद केले हे मला आठवत नाही. मागच्या वर्षी मी नविन कार्ड घेतले. एटीएमच्या गैरवापरा बद्दल मी पोलीस स्टेशनला अॅलन विरुध्द तक्रार नोंदविलेली नाही. अॅलन व माझ्या मध्ये प्रेम व आपुलकीची भावना आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, अॅलन धमकी देतो, बळाचा वापर करतो हे मी खाटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, म्हातरपणी मला त्रास देऊ नका सुखा समाधानाने राहू दया याबाबत मी कधीही अॅलन कडे तक्रार केलेली नाही. याची तारीख व वर्ष मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज पर्यंत प्रतिवादी नंबर १ व २ यांनी मला व माझ्या मुलीला कधीही इथे राहणे बाबत हरकत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगत आहे की, जानेवारी २०२१ पासून महागाव येथील घरातून उसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, समाजातील प्रतिष्ठीत लोक, पॅरीस प्रिस्ट जो मंतेरो, सिस्टर्स यांचेकडून प्रतिवादी नंबर १ व २ यांना समजावून सांगण्या बद्दल प्रयत्न केला परंतु त्याचेही ते ऐकत नाहीत. मी यांना लेखी तक्रार दिलेली नाही. आम्ही त्याची साक्ष घेणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी हे बदखल करतील हे माझे म्हणणे अवाजवी, खोडसाळपणाचे व खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, हॅरी नंतर प्रतिवादी नंबर १ व २ यांनी माझी योग्य ती सेवा श्रृती केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते आज देखील माझी योग्य प्रकारे सेवा श्रृती करण्यास तयार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी मागणी ही अॅलन व शितलवर अन्यायकारक आहे.

२७. मौजे उंबरवाडी , ता.गडहिंग्लज येथे गट नंबर ५७५/क त्याचे भु क्षेत्र ३.१५ आर. आहे. या भुखंडाचा मालक निता हणमंतराव पाटील ही आहे. हे म्हणणे खरे नाही की, हा भूखंड हॅरीने खरेदी करावयाचे ठरविले होते त्याची रक्कम

देखील त्यांनी दिलेली होती. हॅरी २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे नाही की, हॅरी सेवानिवृत्त झालेनंतर प्लॉट खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, हॅरी ने आपल्या हयामध्ये सर्व चल व अचल संपत्ती ही मुलगा अ◌ॅलन व सुन शितल यांना दयावयाचे ठरविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याकरीता त्यांनी साक्षीदारा समक्ष मृत्युपत्र देखील तयार केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, हॅरी यांनी १०/१/२०१८ च्या मृत्युपत्रा अन्व्ये दावा मिळकत व त्यामधील आरसीसी इमारत खुली जागेसह , दोन चाकी अक्टीव्हा स्कुटर, सोन्याची साखळी व सहा अंगठया तसेच उंबरवाडी येथील गट नंबर ५७५/क चा भुखंड प्रतिवादी नंबर १ व २ यांना उपभोग घेण्यासाठी दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, हॅरीची अंतीम इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, मृत्युपत्र करण्यापूर्वी हॅरीने माझ्याशी व मुलीसोबत चर्चा केली व त्यास मी संमती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, तसेच त्याबाबत मित्र व नातेवाईक यांचे बरोबर देखील चर्चा केली होती. हे मला आठवत नाही की, दावा दाखल करण्यापूर्वी मी कधीही माझा हिस्सा मिळावा याबद्दल मी मागणी केलेली नाही. हे मला आठवत नाही की, दावा दाखल करण्यापूर्वी हिस्सा मागणी करीता लेखी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, देण बँकेचे दस्त ऐवज मी खोटा पुरावा देण्यासाठी दाखल केले आहे. ग्रामपंचायत यांनी अ◌ॅलनला लेखी नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अ◌ॅलन ने अंतरजातीय विवाह केला त्याला घराबाहेर काढण्याकरीता हा मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

जबाब समक्ष नोंदविला.

दिनांक २२/०४/२०२५

सही/-

( श्री.न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज